पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८ लेखा विभाग
क्र.लेखा/१०/कावि/ ०१ /२०२०
दिनांक १८ /०१/२०२०

**विषय:-निविदा मिळाल्यानंतर परफॉर्मन्स सेक्युरिटी डिपॉझीट बाबत....**

**परिपत्रक**

पिंपरी चिंचवड मनपामार्फत विविध विकास कामे निविदा मागवुन केली जातात. सदर निविदांबाबत क़ाय कार्यपध्दती असावी. याबाबत वेळोवेळी शासन निर्णय, परिपत्रके बजाविणेत आलेली आहेत. ठेकेदारांनी स्पर्धात्मक दर भरल्यानंतर कंत्राटदारांनी अंदाजपत्रकीय दराच्या १० % पेक्षा कमी दर भरल्यास अतिरिक्त इसारा रक्कम / कामगिरी सुरक्षा ठेव रक्कमेची बँक प्रतिभुती हमी (Additional Performance Security Deposit) निविदेसोबत सादर करण्याच्या सुचना शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२७/९/२०१८ मधील परि.क्र.५.१.१ मध्ये देणेत आलेल्या आहेत. Additional Performance Security Deposit ची रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या DD/FDR/BG स्वरूपात स्विकारण्याबाबत शासन निर्णयात नमुद केले आहे.

तथापि, महानगरपालिका स्विकारत असलेले एफ.डी.आर.बोगस स्वरूपाचे प्राप्त होणार नाहीत. यासाठी आपल्या विभागामार्फत प्रत्येक कामांचे परफॉर्मन्स सेक्युरिटी डिपॉझीटची (एफ.डी.आर.) विभागस्तरावर योग्य ती खात्री करून घ्यावी व ज्या प्रकरणी संशयास्पद बाब निदर्शनास येईल अशा वेळी संबंधित कंत्राटदाराचे DD/FDR/BG संबंधित बँकेत कन्फर्मेशनसाठी पाठविण्यात यावेत व योग्य ती खात्री करून घ्यावी.

तरी सर्व संबंधित विभागप्रमुखांनी सदर परिपत्रकाची दखल घेवुन योग्य ती उचित कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८

प्रति,
सर्व संबंधित विभागप्रमुख